HELD AT ON TIME

## महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## १०/२०१८ या बैठकीचे कार्यवृत्तांत

## दिनांक २६ सप्टेंबर २०१८ दुपारी ०३.३० वाजता

**मुद्दा क्रमांक १ : राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या वितरण व्यवस्थेला धोका पोहोचू नये यासाठी पाणीपट्टीच्या थकबाकी वसुलीसंदर्भात प्राधिकरणाने स्वत:हून पुढाकार घेऊन दिलेल्या आदेशाबाबत**

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कलम १११ (द),१२ व २६ व कलम १३ मधील प्राप्त अधिकारात दिनांक १५/५/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार मऔविमं व सिडको यांव्यतिरिक्त अन्य कोणाचीही माहिती विहित मुदतीत ( मुदतवाढ देऊन सुध्दा ) प्राप्त झाली नाही. म्हणून कलम २६ खाली संबंधितांना कारणे दाखवाची नोटीस जारी करण्याबाबत सदस्य (विधी) यांचे प्रस्तावावर साधकबाधक चर्चा झाली. हे कलम अपवादात्मक परिस्थितीमध्ये विचार करुन वापरण्याची आवश्यकता व्यक्त करुन मा. अध्यक्ष यांनी यासंदर्भातील जलसंपदा विभागाकडून अनौपचारिकरित्या मिळालेल्या माहितीआधारे मार्च २०१८ अखेर रु. १८४९ कोटी थकबाकीबाबत वस्तुस्थिती तसेच या थकीत वसुलीबाबतची प्राधिकरणाचे निदर्शनास आलेली ढोबळ कारणे मा. मंत्री ( जलसंपदा ) यांना कळवावी अशा सूचना दिल्या. या थकीत पाणीपट्टीमुळे कालवा प्रणालीची दुरुस्ती होऊ शकत नाही. त्यामुळे पाणी वापराची कार्यक्षमता कमी राहते तसेच समन्यायी पाणीवाटप होऊ शकत नाही, हे सुध्दा मा. मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणावे असे ठरले.

**मुद्दा क्रमांक २ : राज्यातील लाभक्षेत्र विकास आणि जलव्यवस्थापन विभागाचे बळकटीकरण**

मा. राज्यपाल यांच्या दिनांक २/५/२०१८ च्या पत्रानुसार राज्यातील लाभक्षेत्र विकास आणि जलव्यवस्थापन विभागाचे बळकटीकरण विषयक संकल्पनात्मक टिप्पणी

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI-1. PH.:4347 0909

(Concept Note) मजनिप्रास दयावयाची आहे. सचिव यांनी तयार केलेल्या टिप्पणीवर आधारीत सादरीकरण बैठकीत करण्यात आले. याबाबत सदस्य ( विधी) यांनी सुचविल्यानुसार लाभक्षेत्र विकास यंत्रणा अपेक्षेएवढी यशस्वी का होऊ शकली नाही याची कारणमिमांसा टिप्पणीत थोडक्यात देऊन ती मा. राज्यपाल यांना पाठविण्यात यावी व या संदर्भात जलसंपदा व कृषि विभागाबरोबर मा. राज्यपाल यांच्याकडे बैठक आयोजित करण्याची विनंती करावी अशा सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

**मुद्दा क्रमांक ३ : राज्य जलनिती,मजनिप्रा अधिनियम २००५, मजनिप्रा कायद्याचे नियम व विनियम यांत करावयाच्या सुधारणांविषयक मे. केपीएमजी, ॲडव्हॉयझरी कन्सल्टंट यांना सोपविलेल्या कामाचा आढावा**

मे. केपीएमजी यांनी केलेल्या कामाचा अहवाल सचिव यांनी बैठकीत दिला. कंत्राटातील तरतुदीनुसार सचिव सक्षम असल्याने त्यांनी मोबदला देणेबाबत पुढील कार्यवाही करावी अशा सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

**मुद्दा क्रमांक ४ : मजनिप्रा अधिनियम २००५, सुधारणा अधिनियम २०११मधील कलम १४ नुसार प्राधिकरणाने करावयाच्या कार्यवाहीबाबत**

मजनिप्रा अधिनियम २००५, सुधारणा अधिनियम २०११मधील कलम १४ (१), (२), (३) व (४) नुसार दयावयाच्या अंतिम तारखा निश्चित करुन त्या जाहीर करणे आवश्यक असल्याचे सदस्य (विधी) यांनी निदर्शनास आणले. पाण्याची हक्कदारी देण्यासाठी याबाबतचे निकष प्रथम प्राधिकरणाने निश्चित करणे आवश्यक आहे. बिगर सिंचन हकदारी वितरणाचे निकष प्राधिकरणाने दिनांक २२/९/२०१७ च्या आदेशान्वये निश्चित करण्यात आले आहेत. मात्र सिंचन विषयक हकदारीबाबतचे निकष प्राधिकरणाने निश्चित करणे आवश्यक असल्याचे सदस्य (अभियांत्रिकी) यांनी निदर्शनास आणले. याबाबत धारिकेमध्ये (३०९/२०१०) मे २०१८ मध्ये आदेश घेऊनही कार्यवाही न झालेबाबत मा. अध्यक्षांनी असमाधान व्यक्त केले. महाराष्ट्र सिंचन

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI-1. PH.: 4347 0909

HELD AT ____ ON ____ TIME ____

पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ कलम ७३ नुसार बांधकामाधीन प्रकल्पांना सदर कायदा लागू आहे. त्यामुळे हा अधिनियम अधिसूचित झाल्यानंतर निर्मित सिंचन क्षमतेबाबतही पाणी हक्कांचे (entitlement) संनियंत्रण करणे गरजेचे असल्याचे सदस्य (अभियांत्रिकी) यांनी निदर्शनास आणले. याबाबतची माहिती जलसंपदा विभागाकडून मागविणेबाबत मा. अध्यक्षांनी आदेश दिले. कलम १४ नुसार हक्कदारीशिवाय भूपृष्ठ जल आणि भूजल यांच्या वापरास मज्जाव करण्याबाबत तारखा निश्चित करण्यापूर्वी जलसंपदा विभाग आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेशी चर्चा करण्याकरिता प्राधिकरण स्तरावर सदस्य (विधी) यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी आणि सदर समितीने एक महिन्याचे मुदतीत आपले अभिप्राय दयावेत अशाही सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर हा विषय प्राधिकरणाच्या बैठकीत पुन्हा चर्चेस ठेवावा असे ठरले.

**मुद्दा क्र. ५ :- – मजनिप्रातील अध्यक्ष, सदस्य व अधिकारी कर्मचारी यांना सोयीसुविधा लागू करण्याबाबत**

सदर मुद्यावर सविस्तर चर्चा झाली. "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ही स्वायत्त संस्था आहे" असे अभिप्राय सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या शर्ती नियम २००६ च्या नियम १३ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे :

" इतर भत्ते -- अध्यक्ष व सदस्य राज्यातील तत्सम दर्जाच्या भारतीय प्रशासन सेवेच्या सदस्याला जे इतर भत्ते लागू असतील असे इतर भत्ते मिळण्यास हक्कदार असतील."

मजनिप्राच्या अध्यक्ष पदी मुख्य सचिव दर्जाच्या अथवा उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांच्या दर्जाच्या अधिका-याची नियुक्ती करण्याची तरतूद मजनिप्रा सुधारीत अधिनियम २०१६ च्या नियम ४ (१) (अ) नुसार करण्यात आली आहे. तसेच मजनिप्राच्या सदस्यांना राज्याच्या प्रधान सचिवांना अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी दिली जाते. अध्यक्ष व सदस्यांना याचिकेवरील

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI-1. PH.: 4347 0909

HELD AT ____ ON ____ TIME ____

निर्णयांचे drafting कार्यालयीन वेळेनंतर सुध्दा करावे लागते. यासाठी त्यांना उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल पत्रांचे संदर्भ अभ्यासावे लागतात. यासाठी त्यांना निवासस्थानी काही सुविधा देणे आवश्यक ठरते. या सर्व बाबी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव संमत केला.

**ठराव क्रमाक २२ :** ज्याअर्थी मजनिप्रा ही स्वायत्त संस्था आहे आणि ज्याअर्थी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ( अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या शर्ती ) विनियम २००६ मधील नियम १३ नुसार अध्यक्ष, सदस्य, राज्यातील तत्सम दर्जाच्या भारतीय प्रशासन सेवेच्या सदस्याला जे इतर भत्ते लागू असतील असे इतर भत्ते मिळण्यास हक्कदार असतील, आणि ज्याअर्थी मजनिप्राचे अध्यक्ष मुख्य सचिव दर्जाच्या अधिका-यांमधून निवडले जातात व ज्याअर्थी मजनिप्राच्या सदस्यांना प्रधान सचिवांना अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी देण्यात येत आहे, आणि ज्यार्थी प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांना याचिकेवरील निर्णयांचे drafting कार्यालयीन वेळेनंतर सुध्दा करावे लागते. यासाठी त्यांना उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल पत्रांचे संदर्भ अभ्यासावे लागतात. यामुळे त्यांना निवासस्थानी काही सुविधा देणे आवश्यक ठरते, आणि ज्याअर्थी मंत्रालयातील सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव तसेच मुख्य सचिव यांना दिनांक ८ मे २०१३ चे शासन निर्णयानुसार निवासी दूरध्वनी, इंटरनेट ( निवासी व मोबाईल ), निवासी शिपायाऐवजी रोखभत्ता, वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, निवासी केबल, निवासी संगणक व त्यांची देखभाल, लॅपटॉप, आयपॅड, त्यांची देखभाल, डाटा कार्ड, निवासी प्रिंटर, प्रिंटरसाठी लागणारा टोनर व इतर स्टेशनरीच्या अनुषंगाने एकत्रित ठोक रक्कम मंजूर करण्यात आली आहे, त्याअर्थी हे प्राधिकरण असा ठराव संमत करीत आहे की, प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांना त्यांच्या कामाचे स्वरुप विचारात घेऊन अनुक्रमे मंत्रालयातील मुख्य सचिव व प्रधान सचिव यांना अनुज्ञेय असणा-या सुविधा अनुज्ञेय करण्यात येत असून या सुविधांचे बदल्यात मजनिप्राच्या अध्यक्षांना मुख्य सचिवांप्रमाणे व सदस्यांना प्रधान सचिवांप्रमाणे ठोक भत्ता अनुज्ञेय

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI 1. PH. 4347 0909

करण्यात येत आहे, सदर भत्ता सध्याचे अध्यक्ष व सदस्य (अभियांत्रिकी) रुजू झाल्यापासून म्हणजेच दिनांक १६ मे २०१७ पासून अनुज्ञेय करण्याचा ठराव संमत करण्यात येत आहे.

त्याच प्रमाणे सचिव, मजनिप्रा यांना देखील शासनाचे सचिव यांना देय असलेला ठोक भत्ता अनुज्ञेय करण्याचा ठराव संमत करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २३ :** तसेच मजनिप्रा ( सेवाप्रवेश व कर्मचा-यांच्या सेवेच्या शर्ती ) विनियम २०१३ च्या नियम १९ मधील तरतूद अशी आहे की, "प्राधिकरण त्याला आवश्यक वाटतील अशा विवक्षित सुविधा त्यांच्या कर्मचा-यांना, अध्यक्षांना व सदस्यांना देईल". प्राधिकरणातील बहुतांशी कर्मचारीवृंद हा कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे या कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती, रजा प्रवास सवलत अनुज्ञेय नाहीत. तसेच गट-ड च्या कर्मचा-यांना गणवेश, धुलाई भत्ता दिला जात नाही. सदर कर्मचारी नियत आस्थापनेवर असते तर त्यांना अनुज्ञेय सोयी सुविधा पोटी प्राधिकरणावर आर्थिक भार आला असता, तसेच गेल्या वर्षी रिक्त पदे भरतेवेळी प्राधिकरणाचे निदर्शनास आले की, वेतन व भत्ते बाबतचे प्राधिकरणाचे प्रचलित धोरणामुळे कर्मचा-यांना जो वेतनाच्या स्वरुपात मोबदला मिळतो तो गुणवत्तापूर्ण कर्मचा-यांना आकर्षित करणेस कमी पडतो. त्यामुळे प्राधिकरणास आवश्यक गुणवत्तेचे कर्मचारी मिळत नाहीत. तसेच मुंबईसारख्या ठिकाणचा राहण्याचा व वाहतुकीचा खर्च अनुज्ञेय भत्त्यापेक्षा जास्त येतो. त्याकरिता प्राधिकरणाने मजनिप्रा ( सेवाप्रवेश व कर्मचा-यांच्या सेवेच्या शर्ती ) विनियम २०१३ च्या नियम १९ च्या तरतुदीस अनुसरुन प्राधिकरणाच्या उर्वरित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आरोग्य सुविधा व मोबाईल सुविधा अनुज्ञेय करुन त्याप्रित्यर्थच्या खर्चाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराविक ठोक रक्कम दरमहा देणेबाबतचा ठराव संमत करण्यात आला :

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI-1 PH: 4347 0909

| अधिकारी / कर्मचारी प्रवर्ग | सुविधा ऐवजी ठोक भत्त्याची रक्कम |
|---|---|
| गट "अ" व गट "ब" साठी | रु. २,२५०/- दरमहा |
| गट "क" साठी | रु. १,९५०/दरमहा |
| गट "ड" साठी | रु. १,५००/- दरमहा |

वरीलप्रमाणे ठोक भत्त्याची रक्कम गट अ ते गट-ड मधील नियमित व कंत्राटी तत्वावरील अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १६/०५/२०१७ पासून लागू करण्याचा ठराव संमत करण्यात आला.

**मुद्दा क्रमांक ६ : अध्यक्ष, सदस्य व सचिवांना सुनावणीच्यावेळी वापरण्यासाठी ऑफीस सूट उपलब्ध करुन देण्याबाबत**

मजनिप्राचे काम हे निम्नन्यायिक स्वरुपाचे असल्याने प्राधिकरणाकडे दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणी घेऊन त्यावर निर्णय देण्याचे काम प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्यांना पार पाडावे लागते. सुनावणीसाठी उपस्थित राहताना अध्यक्ष व सदस्य यांनी काळा कोट, काळी पॅन्ट व सफेद शर्ट वापरावा असे संकेत आहेत. तथापि, प्रत्येकाने स्वतंत्रपणे वेगवेगळया दुकांनामधून कपडे खरेदी केले तर त्यात एकरुपता राहणार नाही. मजनिप्राच्या सुनावणीसाठी मजनिप्राचे सचिव देखील उपस्थित असतात. या सर्व बाबींचा विचार करुन प्राधिकरणाने ठराव संमत केला की,

**ठराव क्रमांक २४ :** प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य व सचिव यांना दर तीन वर्षांनी काळा कोट, काळी पॅन्ट, सफेद शर्ट व टाय यांचे दोन सेटस् देण्यात यावेत. हे कपडे शिवण्याकरिता लागणारे कापड निवडण्यासाठी दोन सदस्यीय समिती नेमण्यात यावी. या समितीत मजनिप्राचे अध्यक्ष श्री. के.पी. बक्षी व सदस्य ( विधी) श्री. विनोद तिवारी यांचा समावेश असेल.

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI-1. PH: 4347 0909

HELD AT ______ ON ______ TIME ______

प्राधिकरणाने पुढे असाही निर्णय घेतला की, सध्याचे सचिव डॉ. कुलकर्णी यांची मुदत फेब्रुवारी २०१९ मध्ये संपत असल्याने त्यांना वरील कपडयांचा एक सेट पुरविण्यात यावा. तसेच सदस्य ( भूजल ) अदयापि रुजू झालेले नाहीत. तथापि, नजिकच्या काळात ते रुजू होण्याची शक्यता विचारात घेऊन व सदस्य ( भूजल ) व नवनियुक्त सचिव यांच्याकरिता प्रत्येकी २ सेटसचे कापड खरेदी करुन ठेवण्यात यावे, म्हणजे सर्वांच्या कपडयात एकरुपता राहील.

कापड खरेदी करुन शिवून घेण्याकरिता विहीत पध्दती अनुसरण्यात यावी.

अध्यक्षांचे आभार मानून प्राधिकरणाची बैठक समाप्त करण्यात आली.

Bakshi 11/10/18

( के.पी.बक्षी )
अध्यक्ष

CHAIRMAN'S INITIALS

TAX PRINT • MUMBAI-1. PH: 4347 0909